भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ७१३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/१०/२०१७

**१) निवडणुक आचार सहितेचा उल्लघंन केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १४/१०/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपीने विश्व हिंदु परीषद क्षत्रीय राजाभोज पवार या नावाने प्रचार करण्याचे हेतुने पत्रके काढुन वाटल्याने पोलीस पाटील सलेभाटा यांना पत्रके मिळुन आल्याने, फिर्यादी मिलींद पाडुरंग बगळे वय ५६ वर्ष, रा. पंचायत समीती लाखनी (ग्रा.प निवडणुक आचार सहीता प्रमुख) यांचे लेखी तक्रारी वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७१,ह.(२)(३) भांदवि. सहकलम २ (४) खाजगी सार्वजनिक विद्रुपीकरण कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेभुंर्णीकर पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**२) संगनमत करून गुन्हा करण्याच्या उद्देशाने चाकु बाळगुन मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १४/१०/२०१७ चे २३.४० ते २३.५५ वाजता दरम्यान यातील आरोपी हे संगनमत करून गुन्हा करण्याच्या उद्देशाने दारूचे नशेत स्वत:जवळ चाकु १ फुट लांबीचा अंदाजे ५० रुपयांचा बाळगुन व मा. जिल्हाधकारी साहेब यांचे आदेशाचे उल्लघंन करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. कडव यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४/२५ हत्यार कायदा सहकलम १३५ मपोका. सहकलम ३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. ताराम पो.स्टे जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे

**३) मोटार सायकलच्या धडकेत उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु.. :—**

दिनांक १३/१०/२०१७ चे २२.१५ ते २३.५५ वाजता दरम्यान यातील मृतक आरोपी हा समीर खॉ गलर खॉ वय ५० वर्ष रा. पवनी हा त्याचे ताब्यातील स्कुटी क्र. एमएच ४९ एस ६०९७ ने जात असता भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन रोडवरील खड्डा चुकवित असतांना जखमी कासीम हुसेन याचे मोटार सायकल क्र. एमएच ३१ सी डब्ल्यु ७७३२ ला समोरून जोरदार धडक मारल्याने, आरोपी हा स्वत: गंभिर जखमी होवुन उपचारा दरम्यान मरण पावल्याने व जखमी कासीत हुसेन यांना दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा ढाकणे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३०४ (अ),२७९,३३७ भादवी सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) चारचाकी वाहनाच्या धडकेत एक जखमी :—**

दिनांक ११/१०/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी प्रंशात नामदेवराव कुंभारे वय वय ५१ वर्ष रा. नवीन बसस्थानकचे मागे तुमसर हे त्याचे ताब्यातील हिरो होन्डा क्र.एमएच ३६ डी ३४२५ ने नवीन बसस्थानक तुमसर कडुन इंदिरा नगर कडे मोटार सायकल वळवीली असता, त्याच वेळी यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन नवीन बसस्थानक तुमसर कडुन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मोटार सायकला धडक दिल्याने जखमीचे डोक्याचे डावे बाजुला व खांदयाला मार लागल्याने जखमीचे बयान व डॉ. एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. दुगावकर पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

५) मेटॉडोअर धडकेत एक जखमी . :—

दिनांक १५/१०/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अनिल भैयालाल खोटेले वय २९ वर्ष रा. चिचाळ त्याचा मित्र स्वराज थेर याचे सोबत हिरो होन्डा डिलक्स मोटार सायकल क्र. एमएच३५ आर ९८५५ ने डब्बल सीट गोंदिया वरून नागपुर कडे एनएच ६ रोडने जात असतांना जिल्हाधीकारी कार्यालय समोर त्याच्या विरूध्द दिशेने येणाऱ्या यातील मेटॉडोर आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन तााब्यातील वाहन भरधाव वेगाने ,निष्काळजीपने चालवुन मोटार सायकला धडक मारून फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे बयाना वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आतराम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) संगनमत करून भांडण करून लाकडी काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक १५/१०/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी प्रविण नत्थुजी इखार वय ३७ वर्ष रा. तुळका याचे व आरोपीचे घर हे एकमेंकाचे शेजारी लागुन असुन, आरोपी हे आपल्या घराची सफेदी करीत असतांनी फिर्यादीचे घराचे पोर्चमध्ये ठेवलेल्या चार चाकी गाडीवर सफेदीचा चुना उडाल्याने त्याला हटकले असता आरोपीतांनी संगनमत, भांडण करून फिर्यादीचे डावे खांदयावर, पाठीवर, उजव्या हाताच्या अंगठयावर लाकडी काठीने मारून जखमी केल्याने, फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सरोदे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

७) अचानक प्रकृती खराब होवुन मुलाचा मृत्यु. :—

दिनांक १३/१०/२०१७ चे १२.३० वाजता दरम्यान यातील मृतक सागर सुधीर कोहळे वय ०७ वर्ष रा. आझाद वार्ड तुमसर यांची प्रकृती दोन दिवासा पासुन खराब झाल्याने ,सरकारी दवाखाना तुमसर येथे उपचार करून पुढील उपचारा कामी सा.रू.भंडारा येथे दि. १३/१०/१७ ला नेले असता, डॉ. ने मृत घोषीत केल्याने पो.स्टे. भंडारा मर्ग क्र.००/१७ कलम १७४ जा.फौ.चे आज रोजी टपालाने द्वारे कागद पत्रावरून पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील पोहवा. चिचखेळे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १५/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनांवरती ०४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५६ केसेस करण्यात आले आहे.

(सपोनि. जि. एन. खंडाते )
वाचक शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र. ९८२३३२२९५४

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.